Event Management करण्यासाठी वनविभागामार्फत वृक्ष लागवड मोहिमेचे Event Management चे काम केलेले आहे. त्याप्रमाणे जनजागृतीचे काम करण्यात यावे. असे मा. मंत्री महोदय यांनी सुचित केले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शिविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांचा दिनांक २५ एप्रिल २०१७ ते १ मे २०१७ या कालावधीत "जनजागृती सप्ताह" आयोजित करण्यात यावा. त्यामध्ये मुख्यालय स्तरावर एक मोठा Event आयोजित करण्यात यावा. तसेच प्रत्येक जिल्हा कार्यालयस्तरावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. सदर Event व राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनेची विविध प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात यावी. तसेच रेडिओ जिंगल्स, एस.टी. बसेस, BEST बसेस व एस.टी स्टँड वर होर्डींग्ज लावणे, फिरत्या वाहनांद्वारे मंडळाच्या योजनांची जनजागृती करणे, तसेच बांधकामाच्या ठिकाणी व कामगारांच्या नाक्यावर मंडळाच्या योजनांचे मोठे फलेक्स लावणे, मंडळाच्या योजनांबाबतचे पुस्तक वाटप करणे, इत्यादीमार्फत मंडळाच्या योजनांची**

| | | |
|---|---|---|
| | | **जनजागृती करण्यात यावी. सदर Event मध्ये बांधकामाशी संबंधित शासकिय प्राधीकरणांचा सहभाग घेण्यात यावा. कार्यक्रमाचे Event Management करण्यासाठी वृक्ष लागवड मोहिमेचे Event Management केलेले आहे, त्या धर्तीवर काम देण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ६. | **मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रती कुटूंब रू.५०००/- अर्थसहाय्य योजनेबाबत.** | याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्दशनास आणून दिले की, दिनांक २४.१०.२०१६ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या ठरावानुसार मंडळाकडील नोंदित पात्र बांधकाम कामगारांना बांधकामासाठी उपयुक्त अवजारे/हत्यारे खरेदी करण्यासाठी रु. ५,०००/- प्रतिकुटुंब देण्याच्या योजनेबाबत मंडळाच्या दि.२.११.२०१५ रोजीच्या ठरावानुसार व शासनाच्या दि. ५.४.२०१६ रोजीच्या मान्यतेस अनुसरुन तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी कामगाराची सलग ३ वर्षे नोंदणी असल्याची अट घालण्यात येऊ नये, सदर योजनेच्या लाभाची रक्कम सर्वच जिवित नोंदित बांधकाम कामगारांच्या बँक खात्यावर डी.बी.टी. पध्दतीने हस्तांतरीत करण्यात यावी, या योजनेसाठी कामगारांकडून कोणताही अर्ज घेण्यात येऊ नये, योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्हा कार्यालयाकडे |

असलेल्या जिवित नोंदित बांधकाम कामगारांची संख्या विचारात घेऊन आवश्यक तो निधी जिल्हा कार्यालयास हस्तांतरीत करण्यात यावा. पुढील ३ वर्षानंतर लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगारांची मंडळाकडे मागील सलग ३ वर्षे नोंदणी असणे आवश्यक राहणार नाही. असा ठराव बहुमताने घेण्यात आला आहे.

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रती कुटूंब रू.५०००/- अर्थसहाय्य योजनेबाबत बोलताना मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी कामगारांकडून याबाबत लेखी अर्ज प्राप्त होणे आवश्यक आहे. अशी सुधारणा सुचविली. तसेच, केंद्र शासनाच्या सुचनेनुसार मंडळाकडे सलग ३ वर्षे नोंदणी/नुतनीकरण असलेल्या कामगारांनाच सदर योजनेचा लाभ देय आहे, अशी आमची धारणा आहे. तथापि, बांधकाम कामगारांची नोंदणी होताच त्यांना उपरोक्त योजनेचा लाभ द्यावा अशी मान्यता शासनामार्फत प्राप्त झाल्यास त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.  तथापि, तसे आदेश शासनाकडून निर्गमित होणे आवश्यक आहे. तसेच, पुढील वेळी लाभ घेताना नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. अशीही सुधारणा मा. कामगार आयुक्त यांनी सुचविली.

त्यावर मा. मंत्री महोदय यांनी सदर योजनेसाठी करावयाचा अर्ज सोपा व सुटसुटीत ठेवण्याच्या सुचना केल्या व योजनेबाबत सुधारित प्रस्ताव व लाभाच्या अर्जाचा प्रारुप नमूना शासनमान्यतेस्तव सादर करण्याबाबत निर्देशित केले.त्यानुसार सदर बैठकीत मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना अवजारे व हत्यारे खरेदी करण्याकरिता रु. ५०००/- अर्थसहाय्य योजनेचा लाभ मंडळाकडील सर्वच नोंदित बांधकाम कामगारांना देण्यात यावा. तथापि. त्यासाठी कामगारांकडून विहीत नमुन्यात अर्ज घेण्यात यावा. सदर अर्जाचे प्रारूप शासनास सादर करण्यात यावे व पुढील लाभ कामगारांस ३ वर्षांनी नियमानुसार देण्यात यावा. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

त्यानुसार मंडळाच्या दिनांक १७.०१.२०१७ च्या पत्रानुसार सदर प्रस्तावित बदल केंद्र शासनाच्या सुचनेशी सुसंगत आहे किंवा कसे? याबाबत मार्गदर्शन करण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली होती. त्यानुसार शासनाने याबाबत परस्पर केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करण्याबाबत दिनांक ०१.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. दरम्यान दिनांक ०१.०९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मंडळामार्फत केंद्रशासनाकडुन मागविण्यात आलेल्या मार्गदर्शनास अनुसरून उपसचिव, कामगार व रोजगार मंत्रालय,

भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक ११.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अंतर्गत दिलेल्या दिनांक २७.०२.२०१४ रोजीच्या आदेशामधील परिच्छेद ५(v) मध्ये नोंदित बांधकाम कामगारांना दर तीन वर्षातून एकदा अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रति कुटुंब रु. ५ हजार अर्थसहाय्य ही योजना प्रत्येक राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदित असलेल्या सर्व बांधकाम कामगारांना सदर योजना दर तीन वर्षातून लागू असल्याबाबत नमूद केलेले आहे. तसेच याबाबत राज्य शासनास त्यांना योग्य वाटेल तो निर्णय त्यांनी त्यांचे स्तरावर घ्यावा. असेही कळविण्यात आले आहे.

याबाबत शासनास अहवाल सादर करण्यात आला असून शासनाने त्यांच्या दिनांक २०.०१.२०१७ च्या पत्रान्वये केंद्रशासनाच्या खुलाशाबाबत मंडळाने स्वयंस्पष्ट अभिप्राय मंडळाने सादर करण्याबाबत कळविले आहे. त्याप्रमाणे दिनांक १४.०२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंडळाने सदर केंद्र शासनाच्या उक्त पत्रास अनुसरून मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना अवजारे / हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रतिकुटुंब रू. ५ हजार अर्थसहाय्य ही योजना राबविणे योग्य आहे व त्याअनुषंगाने सदर योजना

राबविण्याबाबत मंडळामार्फत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास शासन स्तरावरून मान्यता प्रदान करण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावास अद्याप शासनाची मान्यता अप्राप्त आहे.

यावर सदर प्रस्तावास शासनाने आजच मान्यता दिलेली असून त्याबाबतचा शासन निर्णय उद्या निर्गमित होईल असे मा. मंत्री महोदय यांनी नमूद केले. त्या अनुषंगाने जिल्हा कार्यालयांमार्फत निधीचे प्रस्ताव मागविण्यात यावे व कामगारांना लाभाचे वाटप करण्यास तात्काळ सुरुवात करावी असे निदेश मा. मंत्री महोदय यांनी दिले. त्याचप्रमाणे सदर योजनेची प्रेस नोट तयार करून त्याची विविध वृत्तपत्रातून प्रसिद्धी करण्यात यावी, असेही सुचित करण्यात आले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रती कुटूंब रू.५०००/- अर्थसहाय्य योजनेची शासनमान्यतेनुसार तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. त्यासाठी जिल्हा कार्यालयांमार्फत निधीचे प्रस्ताव मागविण्यात यावे व कामगारांना लाभाचे वाटप करण्यास**

| | | |
|---|---|---|
| | | **तात्काळ सुरुवात करावी व सदर योजनेची प्रेस नोट तयार करून त्याची विविध वृत्तपत्रातून प्रसिद्धी करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ७. | **उपकर जमा करण्यासाठी प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping करणेबाबत.** | याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्देशनास आणुन दिले की, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम ३ अन्वये जमिनीचे मुल्य वगळता बांधकामाच्या एकुण रक्कमेच्या १% रक्कम उपकराअंतर्गत वसूल करण्याची तरतूद आहे. सदर उपकराची रक्कम बांधकामास परवानगी देणाऱ्या प्राधिकरणांमार्फत जमा करण्यात येते.<br>तथापि, सर्व बांधकाम आस्थापनामार्फत मंडळाकडे उपकराअंतर्गत भरावयाची आवश्यक संपूर्ण रक्कम विहित मुदतीत भरली जाते याची खात्री करून घेण्यासाठी मंडळाकडे पुरेसा अधिकारी/कर्मचारी वर्ग व माहिती तंत्रज्ञान विषयक सुविधा उपलबध नाहीत.<br>सर्व पात्र बांधकाम आस्थापनांनी बांधकामाच्या एकुण रक्कमेच्या १% देय रक्कम मंडळाकडे जमा करण्यासाठी मंडळाकडे अशा सर्व आस्थापनांची माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यातील सर्व बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping GPS |

System व्दारे करणे आवश्यक आहे.

याबाबत मा. मंत्री महोदय यांनी उत्तर प्रदेश राज्यामध्ये अशा प्रकारे सॅटेलाईट पद्धतीने Mapping करण्यात आलेले असून त्यामुळे त्यांचे सेसच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यांच्याकडून सदर योजनेबाबतची माहिती मागवुन घेण्यात यावी. सदर प्रकल्प राबविण्यासाठी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेमार्फत बांधकामाच्या ठिकाणाचे GPS System द्वारे Mapping करणाऱ्या कंपनीची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी. असे निदेश दिले. अशा प्रकारे Mapping केल्यास कामगारांची नोंदणीही वाढेल, असेही ते म्हणाले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: राज्यातील बांधकामाच्या ठिकाणांचे GPS System द्वारे Mapping करण्यासाठी प्रथम KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेमार्फत बांधकामाच्या ठिकाणाचे GPS System द्वारे Mapping करणाऱ्या कंपनीची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | | |
|---|---|---|
| ८. | **बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत.** | याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्देशनास आणुन दिले की, दिनांक २४.१०.२०१६ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या ठरावानूसार मा.अध्यक्ष यांनी बांधकाम कामगारांच्या पाल्यांना ते जेथे काम करतात तेथे पाळणाघराची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर उपसचिव (कामगार) यांनी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ हे पाळणाघराच्या सुविधा पुरवित असून, हे काम त्यांच्याकडे सोपविण्यात यावे असे सुचविले होते.<br><br>तसेच, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम ३५ अन्वये ज्या बांधकामाच्या ठिकाणी ५० पेक्षा अधिक महिला बांधकाम कामगार काम करतात अशा ठिकाणी सदर महिला बांधकाम कामगारांच्या ६ वर्षे वयाखालील पाल्यांसाठी पाळणाघरासाठी खोल्या उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. अशा खोल्या - (अ) पुरेशी निवास व्यवस्था असलेल्या (ब) पर्याप्तपणे प्रकाशीत आणि वायुवीजन असलेल्या (क) स्वच्छ आणि निरोगी स्थितीत असलेल्या (ड) लहान बाळं व मुले यांची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षीत महिलांच्या नेतृत्वाखाली असाव्यात, अशी तरतूद आहे. शासनाच्या महिला व बालविकास |

विभागाअंतर्गत पाळणाघर योजना राबविली जाते.

याबाबत मंडळाच्या दिनांक ०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीत ज्या बांधकामाच्या ठिकाणी ५० पेक्षा अधिक महिला बांधकाम कामगार काम करतात अशा ठिकाणी सदर महिला बांधकाम कामगारांच्या ६ वर्षे वयाखालील पाल्यांसाठी पाळणाघराची सुविधा अधिनियमाच्या कलम ३५ अन्वये उपलब्ध करून देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास मंडळासमक्ष ठेवण्यात यावे. असेही सर्वानुमते ठरले सदर बाबतचे प्रस्ताव अद्याप मंडळास प्राप्त झालेले नाहीत. असे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

सदर विषयावर बोलताना मा. मंत्री महोदय यांनी पाळणाघर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मंडळामार्फत शासनमान्य KPMG या आय.टी कंसल्टंटची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था (NGO) व या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या इतर संस्था यांना नियुक्त करण्यात यावे, असे निदेश दिले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव: बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मंडळामार्फत शासनमान्य KPMG यांची आय.टी. कंसल्टंटची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था (NGO) व या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या इतर संस्था यांना नियुक्त करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ९. | **बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी शाळा बांधणेबाबत.** | याबाबत बोलताना मा. कामगार आयुक्त यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ६० अंतर्गत केंद्र शासनाने त्यांच्या दि. ०७.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये खालील आदेश पारीत केलेले आहे.<br><br>"Whereas it has come to the notice of the Central Government that some of the States by taking convenient interpretation of Section-२२ in general or Section २२ (h) of BOCW (RE & CS) Act,१९९६ in particular, are spending the Cess Fund for Construction of Buildings for Schools, |

Training Centres, Labour Shed-cum-Night Shelters, Waiting Halls, Hostels etc. which is in violation of the provisions of the Act. ;

Whereas, Construction of Building for Schools, Hospitals, Training Centres, Labour Shed-cum-Night Shelters, Waiting Halls, Hostels etc. are the substantive functions of the respective departments of a State Government, having their own Budget Allocation to cater the needs of the general public of which BOC worker is a miniscule subset.

Whereas, Section २२(h) does not allow diversions from BOCW Cess fund **for any purpose other than for Welfare of BOCW workers and families exclusively;**

Now, therefore, in exercise of the powers conffered on the Central Government, the Ministry of Labour and Employment directs all the State Governments and UT Administrattions not to spend the Cess Fund for Construction of Building for Schools, Hospitals, Training Centres, Labour

Shed-cum-Night Shelters, Waiting Halls, Hostels etc. or for any purpose other than for Welfare of BOCW workers and families exclusively. In case of any such violation, immediate corrective steps should be taken and the Fund so spent should be recouped in the BOC Workers Welfare Cess Fund with immediate effect under intimation to the Central Government."

त्यावर मा. अध्यक्ष यांनी "बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी शाळा बांधणे" ऐवजी "बांधकाम कामगारांच्या पाल्यांना बांधकामाच्या ठिकाणी शाळा चालविणे" अशी सुधारणा सुचविली व त्यासाठी मुलांची योग्य काळजी घेणाऱ्या संस्थेला नियुक्त करावे असे सुचविले. त्याचप्रमाणे सदर बैठकीतील विषय क्र. ८ बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करणे व विषय क्र.९ बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी शाळा चालविणे संबंधित विषय असुन दोन्ही विषय एकत्रित करुन **"बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी Play-School सुविधा उपलब्ध करून देणे"** असा विषय घेण्यात यावा, अशीही सुधारणा मा. अध्यक्ष यांनी सुचविली.

त्यावर मालक प्रतिनिधी श्री मगर व श्रीमती आगटे यांनी अशा प्रकारचे Play-School चालविणाऱ्या अनेक संस्था आहेत. (उदा. Rotary Club. Swarup Vardhini) त्यांना काम देण्याबाबत विचार व्हावा असे सुचविले.

त्यावर मा. मंत्री महोदय यांनी सदरचे काम करणाऱ्या संस्थेची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा प्रक्रीया अवलंबावी लागेल, असे नमूद करुन त्यासाठी मंडळामार्फत शासनमान्य आय.टी कंसल्टंटची KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था(NGO) यांना नियुक्त करावे असे निदेश दिले. तथापि, याबाबत अभ्यास करण्यासाठी मालक प्रतिनिधी श्री. मगर व श्रीमती वेदा आगटे यांचेमार्फत Rotary Club. Swarup Vardhini वा इतर संबंधित संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त करुन घ्यावा असेही ते म्हणाले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी प्लेस्कुल सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मंडळामार्फत शासनमान्य आय.टी कंसल्टंटची KPMG यांची नियुक्ती करावी व सदर Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन**

| | | |
|---|---|---|
| | | **सदर क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था (NGO) यांना नियुक्त करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १०. | **नोंदित बांधकाम कामगारांना Primary Health Kit पुरविणेबाबत.** | याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी असे स्पष्ट केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ३६ अन्वये कामगारांसाठी बांधकाम मालकाने बांधकामाच्या ठिकाणी प्रथमोपचार सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतुद आहे.<br>कामगारांसाठी बांधकामाच्या ठिकाणी प्रथमोपचार सुविधा (Primary Health Kit) उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मालकाची असते, असे मा. उपसचिव श्रीमती सिंघल यांनी स्पष्ट केले.<br>याबाबत मालक प्रतिनिधी श्री मगर यांनी प्रथमोपचार सुविधा (Primary Health Kit) कोण पुरवणार व त्याची व्यवस्था कशी ठेवणार तसेच सदर Kit बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कामगारांसाठी ठेवणे अपेक्षित आहे, प्रत्येक कामगारास स्वतंत्र Kit देणे अपेक्षित नाही, असा मुद्दा उपस्थित केला.<br>कामगार प्रतिनिधी श्री कुटास्कर यांनी सदर Kit मधील औषधे वेळोवेळी Expire |

| | | |
|---|---|---|
| | | होताच बदलणे आवश्यक असते. ती जबाबदारी कोण घेणार असा मुद्दा उपस्थित केला. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना Primary Health Kit बाबतचा प्रस्ताव सध्या स्थगित ठेवण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ११. | **बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबत.** | सदर मुद्याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्देशनास आणुन दिले की, उत्तर प्रदेशात उत्तर प्रदेश इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व रेल्वे कॅन्टीन व्यवस्थापन यांच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम कामगारांसाठी बांधकामाच्या ठिकाणी मध्यान्ह भोजन पुरविण्याची योजना राबवत असल्याचे समजते. तथापि, याबाबत अधिनियमामध्ये तरतुद आढळुन येत नाही अथवा तशा कोणत्याही सूचना केंद्र शासन वा राज्य शासन यांचे मार्फत प्राप्त झालेल्या नाहीत.<br><br>"बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबत" ही योजना चांगली आहे असे मा. मंत्री महोदय यांनी नमूद केले. मा. अध्यक्ष यांनी सर्व नामांकित संस्थांकडून प्रस्ताव मागवून योग्य त्या संस्थेची निवड करण्याचे सुचविले. त्यावर मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी सदर योजनेसाठी बचत गट नेमण्यात यावे, असे |

| | | |
|---|---|---|
| | | सुचविले.<br>त्यावर मा. मंत्री महोदय यांनी सदर योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे, असे निदेश दिले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १२. | **केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अन्वये दिलेल्या निदेशाबाबत ठराव घेणे. मंडळातील नोंदीत बांधकाम** | याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी असे स्पष्ट केले की, केंद्र शासनाच्या दि.०९.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार सदर योजनेअंतर्गत |

| | | |
|---|---|---|
| | **कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करणे.** | अदा करावयाची प्रिमियमची किमान ५०% रक्कम मंडळाने अदा करावयाची आहे. इतर सोशल सिक्युरिटी योजनेतंर्गत अंतर्भूत नसणा-या १८ ते ४० वयोगटातील व इन्कम टॅक्स पेयर नसणा-या बांधकाम कामगारांसाठी सदर योजना लागू करण्याचे निकष आहेत. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी लाभार्थीचे वैध बचत खाते असणे, मोबाईल क्र. असणे अनिवार्य आहे. प्रत्येक लाभधारकाच्या वयानुसार प्रिमियमची रक्कम वेगळी आहे, असेही सचिव यांनी स्पष्ट केले.<br><br>तथापि, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि. ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये "मंडळाचे सध्या मॅन्युअल पध्दतीने चालू असलेले काम तसेच, कामाचा व्याप व उपलब्ध कर्मचारी संख्या विचारात घेता मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार सोशल सिक्युरिटी योजनेंतर्गत अंतर्भुत आहेत किंवा नाहीत, इन्कम टॅक्स पेपर आहेत किंवा नाहीत, तसेच त्यांचे बचत खात्याचा तपशील व मोबाईल क्रमांक इ. बाबी तपासणे मंडळास सध्या शक्य नाही. त्यामुळे मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी", असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला आहे. |

याबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांच्या समवेत दि. २२.०२.२०१७ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत विचार करण्याचे निदेश मा. मुख्य सचिव यांनी दिले आहेत. त्यानुसार ज्या नोंदीत पात्र बांधकाम कामगारांनी सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी प्रिमियमची रक्कम अदा केलेली आहे, अशा कामगारांना सदर रक्कमेची किमान ५० % प्रतिपूर्ती करणेबाबत ठराव घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे असे मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले.

याबाबत बोलताना मा. मंत्री महोदय यांनी नोंदित बांधकाम कामगारांना प्रति लाभार्थी रु. १०००/- इतकी पेन्शन मिळेल असे या योजनेचे स्वरूप असावे तसेच मंडळाकडे मोठया प्रमाणात निधी उपलब्ध असल्याने कामगार योगदानाची १००% रक्कमेची प्रतिपुर्ती मंडळामार्फत करण्यात यावी, असे सुचविले. त्यावर मंडळ सचिव यांनी १८ ते ४० वयोगटातील कामगारांसाठी रु. १०००/- मासिक पेन्शन मिळणसाठी रु.४२/- ते रु.२९१ इतकी रक्कम अदा करावी लागेल असे स्पष्ट केले.

मा. कामगार आयुक्त यांनी सदर योजनेसाठी कामगाराकडून अर्ज, त्याने

| | | |
|---|---|---|
| | | भरलेल्या प्रिमियमची बँकेची पावती व इतर आवश्यक कागदपत्रे घेवून प्रतिपुर्ती पध्दतीने सदर योजना लागु करण्यात यावी असे सुचविले. तसा प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा असे निदेश मा. मंत्री महोदय यांनी दिले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत रु.१०००/- प्रति लाभार्थी इतकी पेन्शन १००% प्रतिपुर्ती पध्दतीने लागु करणे व सदर योजनेसाठीचा प्रस्ताव शासनास पाठविणे व शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर सदर योजना बांधकाम कामगारांना लागू करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १३. | **मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडे तत्वावर घरे पुरविण्याच्या योजनेबाबत.** | याबाबत मंडळाच्या सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, केंद्र शासनाच्या दि.०५.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना भाडेतत्वावर घरे उपलब्ध करून देण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.<br>दि.२३.०६.२०१६ रोजी मंडळाच्या बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी मंडळाकडील |